**MAHARASHTRA FILM, STAGE & CULTURAL DEVELOPMENT CORPORATION LIMITED**

**महाराष्ट्र चित्रपट रंगभूमी आणि सांस्कृतिक विकास महामंडळ मर्या**

(A Government of Maharashtra Undertaking)

( महाराष्ट्र शासनाचा उपक्रम )

**Dadasaheb Phalke Chitranagari (दादासाहेब फाळके चित्रनगरी ) गोरेगाव पूर्व, मुंबई**

Filmcity, Mumbai

https://filmcitymumbai.org

---

**ओटीटी प्लॅटफॉर्म या माध्यमासंदर्भात विविध माहिती जाणून घेण्यासाठी महाराष्ट्र चित्रपट,रंगभूमी आणि सांस्कृतिक विकास महामंडळाच्या व्यवस्थापकीय संचालक स्वाती म्हसे पाटील यांच्या अध्यक्षतेखाली यशवंतराव चव्हाण सेंटर येथे आज बैठक आयोजित करण्यात आली होती. दूरदृश्यप्रणालीद्वारे तसेच प्रत्यक्षदेखील मनोरंजन क्षेत्रातील विविध तज्ज्ञानी उपस्थिती दर्शवली.**

आगामी काळात ओटीटी प्लॅटफॉर्म वरील संधी व त्याच अर्थकारण समजून घेऊन मनोरंजन क्षेत्राकरिता आश्वासक पाऊल उचलण्यासाठी शासन प्रयत्नशील असल्याचे व्यवस्थापकीय संचालक स्वाती म्हसे पाटील यांनी सांगितले.

यावेळी सह व्यवस्थापकीय संचालक डॉ.धनंजय सावळकर, वित्तीय सल्लागार मुख्यलेखावित्तअधिकारी चित्रलेखा-खातू रावराणे, उप अभियंता ( सिव्हिल) विजय बापट, केपीएमजी सल्लागार अनय पिंपळकुटे तसेच मनोरंजन माध्यमात काम करणारे अभिजित साटम, अमित भंडारी, चंद्रकांत वीसपुते, श्री. दत्तात्रय, सुरेश तळेकर तसेच दूरदृश्यप्रणालीद्वारे फिल्मसिटी महामंडळाचे विशेष कार्यकारी अधिकारी संजय कृष्णाजी पाटील, सांस्कृतिक कार्य संचालनालयाचे संचालक विभीषण चवरे, श्रीरंग गोडबोले, अभिजित पानसे, अक्षय बर्दापूरकर, अशोक राणे आदि मान्यवर उपस्थित होते.